ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख १८ फेब्रुवारी, १९५३ अंक ७

## विविध माहिती

**वाचनालयाची कामगिरी**—अमेरिकेंतील ओहिओ संस्थानच्या सार्वजनिक वाचनालयानें १९५२ सालीं ४५,००,००० पुस्तकें वाचकांना पुरविलीं. वाचनालयानें ह्या कामासाठीं एक मोटार ठेवली होती. अमेरिकेच्या ग्रामीण विभागांतून पुस्तकांचा पुरवठा करण्यासाठीं अशा ५३ फिरत्या मोटारी हिंडत असतात.

**१५,००० निर्वासितांची सोय**—बिहार राज्य सरकारनें १५,००० निर्वासितांची सोय करण्याचें मान्य केलें आहे. बिहारमधील तीन जिल्ह्यांत त्यांच्या स्वतंत्र वसाहती स्थापन करण्यांत येणार आहेत.

**जंगली जनावरांचें संरक्षण**—अमेरिकेंतील जंगलांतून असणाऱ्या वन्य जनावरांचें संरक्षण करण्यासाठीं १९५३ सालीं अमेरिकन सरकार १ कोटी डॉलर्स खर्च करणार आहे. जंगलांतील कांहीं भाग ह्या जनावरांच्या वसतीसाठीं मुद्दाम राखून ठेवण्यांत आलेला असतो. शिकारीच्या साहित्यांवर कर बसवून वरील रकम उभारण्यांत आली असून ती निरनिराळ्या संस्थानांच्या सरकारांना त्यांच्या भूविस्तारांच्या व गरजेच्या प्रमाणांत वाटून दिली जाते.

**कांटेरी तारेची आयात**—भारत सरकारनें परदेशाहून ७,००० टन कांटेरी तार आयात केली आहे. आयात केलेल्या तारेची किंमत शेतकऱ्यांना परवडण्यासारखी नसल्यानें भारतीय सरकार राज्यसरकारांना नियंत्रित दरानें तार पुरविणार असल्याचें समजतें.

**भेटीसाठीं फौंटनपेन्स आणलीं, पण**—पार्कर फौंटनपेन कंपनीचे चेअरमन मि. केनेथ पार्कर हे ऑस्ट्रेलियाला गेले. तेव्हां त्यांच्याजवळ १८ पार्कर पेन्स होतीं. सिडनें येथील बंदरांत उतरतांच जकात अधिकाऱ्यांनीं तीं त्यांच्याजवळून काढून घेतलीं. भारतामधील आपल्या मित्रांना देण्यासाठीं त्यांनीं तीं जवळ घेतलीं होतीं. मि. पार्कर ऑस्ट्रेलियाहून भारतांत येण्यास निघाले, तेव्हां सर्व पेन्स त्यांना परत देण्यांत आलीं.

**आपण झोपतोंच अधिक**—बायबलमध्यें मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा ७० वर्षांची सांगितलेली आहे. इतकीं वर्षें जगणारा मनुष्य निरनिराळ्या शारीरिक व्यापारासाठीं किती काळ घालवेल त्याचा हिशोब एका आकडे-शास्त्रज्ञानें केला आहे तो असा:—८ वर्षें करमणूक, ६ वर्षें खाणेंपिणें, ३ वर्षें शिकणें, ५ वर्षें प्रवास, ४ वर्षें बोलणें, १४ वर्षें काम करणें, ३ वर्षें वाचणें, २४ वर्षें झोपणें आणि ३ वर्षें आजारांतून बरें होणें.

**जपानचे व्यापारी प्रतिनिधी**—मलायांतील रबराचें उत्पादन व निर्यात ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं सहा जपानी व्यापारी प्रतिनिधी सिंगापूरला गेले आहेत. शक्य झालें तर मलायामधून रबर विकत घेण्याचीहि व्यवस्था ते करतील. १९५१ मध्यें जपाननें जितकें रबर आयात केलें त्याच्या निम्में मलायामधून विकत घेतलेलें होतें.

**कांच सामानाचा कारखाना**—एक जपानी कंपनी आणि म्हैसूरचें सरकार ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें भारतांत एक कांच सामानाचा कारखाना काढण्यांत येणार आहे. सदर कंपनी कारखान्याची यंत्रसामुग्री व तज्ज्ञ भारताला पुरविणार आहे.

**विना-परवाना रेडिओ**—मुंबई आणि कलकत्ता ह्या शहरांतून बरेच रेडिओ विना-परवाना वापरण्यांत येत आहेत असें समजतें. त्यांचा उपयोग बाजारभाव पाठविण्यासाठीं केला जातो असें पोलिसांचें म्हणणें आहे. मथुरा येथें पोलिसांनीं असा एक रेडिओ जप्त केला. रेडिओवर मुंबई व कलकत्त्याहून बाजारभाव प्रक्षेपित करण्यांत येत होते.

**जपानी गिर्यारोहकांची स्वारी**— समुद्रसपाटीपासून २६,५५८ फूट उंचीवर असलेल्या हिमालयाच्या एका शिखरावर चढण्याचा प्रयत्न १६ जपानी गिर्यारोहक करणार आहेत. ही तुकडी पुढील महिन्यांत भारताला येण्यासाठीं निघणार आहे. शिखराचा रस्ता ठरविण्यासाठीं आघाडीची एक तुकडी गेल्या वर्षी भारतांत येऊन गेली.

**राजस्थानच्या सरकारला मदत**— राजस्थान सरकार पैशाच्या अडचणींत सांपडल्यामुळें त्यानें भारतीय सरकारकडे २॥ कोटी रुपये कर्जाची मागणी केली होती. भारत-सरकारनें १॥ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. राजस्थानच्या सरकारला अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करतां यावी म्हणून पुढील पांच वर्षांत दर वर्षी २॥ कोटी रुपयांची मदत करण्यांत यावी, अशी शिफारस फिनॅन्शिअल कमिशननें केली असल्याचें समजतें.

**सीलोनमधील लोकसंख्येची वाढ**—१९५२ सालांत सीलोनमधील लोकसंख्या दर महिन्याला १७,००० नें वाढत होती, असें आढळून आलें आहे. ह्याचा अर्थ असा कीं, ह्या काळांत दर तासाला २३ मुलांची भर पडत होती. १९५२ सालीं सीलोनची लोकसंख्या ८०,००,००० लाख होईल असा अंदाज अधिकृतरीत्या करण्यांत आला आहे.

### पुणें जिल्हा सहकारी दुष्काळी परिषद्

पुणें जिल्हा सहकारी बोर्डाच्या विद्यमानें पुणें येथील गोखले हॉलमध्यें ता. ८ मार्च १९५३ रोजीं रविवारीं १ वाजतां प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे अध्यक्षतेखालीं पुणें जिल्ह्यांतील सर्व शेतकी सोसायट्यांच्या सभासदांची दुष्काळी परिषद् भरणार आहे.

### सहकारी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, सांगली

दक्षिण सातारा जिल्हा को. बोर्डाच्या विद्यमानें सांगली येथें को. सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास भरविणेचें ठरविलें आहे. सदर क्लास २० फेब्रुवारी १९५३ पासून दीड-दोन महिने चालेल. दक्षिण सातारा जिल्ह्यांतील सहकारी संस्थांनीं आपले अन्ट्रेंड सेक्रेटरींना सदर क्लासला पाठवून क्लासचा फायदा घ्यावा. दक्षिण सातारा जिल्ह्यांतील नवीन अन्ट्रेंड सेक्रेटरींनींहि व इतर व्ह. फा. पास झालेल्या उमेदवारांनीं अर्ज तारीख २० फेब्रुवारी १९५३ चे आंत पाठवावेत. सोबत क्लास व परिक्षेची फी मिळून एकंदर रु. ३ ची मनिआर्डर पाठवावी. ज्यांनीं मुदतींत अर्ज व फी पाठविली असेल त्यांनीं २० फेब्रुवारी १९५३ रोजीं सकाळीं ११ वाजतां बोर्डाचे [ कार्लेकर वाडा, खणभाग, ५८२ सांगली ] ऑफिसमध्यें हजर रहावें.

हातमागाच्या कापडावर वर्जांचा शिक्का—उत्तर प्रदेशांत हातमागाच्या २० औद्योगिक सहकारी संस्था काम करीत आहेत.

—भारतीय संस्कृतीसंबंधीं संशोधन—इंडियन रेनाझान्स सोसायटी ह्या संस्थेची बैठक नुकतीच दिल्ली येथें भरली होती. भारतीय संस्कृति आणि संस्कृत वाङ्मय ह्यांच्या संशोधनासाठी एक स्वतंत्र संघटना स्थापण्याचा निर्णय त्ींत घेण्यांत आला. वरील विषयासंबंधीचीं दुर्मिळ प्राचीन पुस्तकें मिळविणें आणि प्रकाशित करणें, इत्यादि कामें नवीन संघटना करणार आहे.

भारतीय कलांचें रशिआंत प्रदर्शन—लेनिनग्रॅड येथील हर्मिटेज आर्ट म्युझिअम ह्या भव्य इमारतींत भारतीय कलावस्तूंचें प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. १७ व्या ते १९ व्या शतकांतील हस्तकौशल्यांचे नमुने प्रदर्शनांत ठेवण्यात आले आहेत. त्याशिवाय हाडावरील व लाकडावरील नक्षीकाम, जुन्या इमारतींचीं छायाचित्रें, सीलोनमधील हत्यारें, इत्यादि वस्तूहि प्रदर्शनांत मांडण्यांत आल्या आहेत.

कुरुक्षेत्रावर मंदिर होणार—कुरुक्षेत्रावर ज्या ठिकाणीं श्रीकृष्णानें अर्जुनाला गीता सांगितली त्या ठिकाणीं एक संगमरवरी चबुत्रा बांधण्यांत येणार आहे. त्यावर गीतेचे १८ अध्याय कोरण्यांत येणार आहेत. चबुत्रा गाभाऱ्यांत घेऊन त्यावर एक मंदिर उभारण्यांत येईल. बिर्ला कुटुंबानें मंदिरासाठी मोठी मदत दिली आहे. मंदिरासाठी ३ लाख रुपये खर्च येईल. १९५६ सालीं तें पुरें होईल.


किर्लोस्कर

५ हॉ.पॉ.वर चालणारा

आमच्या वसंत नं. ३, शरद वगैरे पॉवर चरकांच्या मालिकेंत नवीन 'कोयना' चरकाचे आगमन. कमी पॉवर लागत असल्यानें भांडवलांत बचत झाली आहे.




विशेष माहितीसाठीं लिहा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (द. सातारा)

—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालू झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १८ फेब्रुवारी, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## संशोधनाचे आर्थिक फायदे

### अमेरिका, ग्रेटब्रिटन व भारत

१९१५ सालीं अमेरिकेंत १०० संशोधन शाळा होत्या. आतां त्यांची संख्या ३,३०० झाली असून त्यांत १,६५,००० लोक काम करीत आहेत. गेल्या वीस वर्षांत अमेरिकेंतील संशोधनावरील खर्च दहापटीनें वाढला आहे. आजचा तो खर्च सालिना २,००,००,००,००० डॉलर्स आहे. संशोधनानें औद्योगिक उत्पादनास जोराची चालना दिलेली आहे. अमेरिकेची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या ७% आहे, पण जागतिक उत्पादनाच्या निम्में उत्पादन अमेरिकेंत होतें. उत्पादनाची गति एकसारखी वाढतच आहे. सिंथेटिक्सच्या प्रगतीमुळें, उत्पादनाचे प्रकार आणि त्याचा आकार ह्यांत क्रांति झाली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि तज्जन्य ॲटॉमिक नियंत्रण व गणन ह्यांमुळें होणाऱ्या प्रगतीची कल्पनाहि करणें अवघड आहे. " नवे नवे शोध आत्मसात् करण्याची अमेरिकन कारखान्यांची शक्ति जोंवर कायम आहे, तोंवर तेथील औद्योगिक उत्कर्षाचें पाऊल कल्पनातीत वेगानें पुढें पडत राहील " असें मॅसेचुसेटस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष, डॉ. जेम्स किलिअन हे म्हणाले, त्याची पार्श्वभूमि वरील प्रकारची आहे.

ग्रेटब्रिटनमध्येंहि औद्योगिक संशोधनाची प्रगति चालू आहे. १९४६ च्या मानानें आतां खासगी फर्म्सचा संशोधनावरील खर्च ५०% वाढला आहे आणि संशोधकांची संख्याहि त्याच प्रमाणांत जास्त झाली आहे. विवक्षित औद्योगिक क्षेत्रांतील फर्म्स एकत्र येऊन, सर्वांना वाटणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक तें संशोधन करवितात. अशा संशोधनावरील खर्चहि १५ लक्ष पौंडांवरून ३५ लक्ष पौंडांवर गेला आहे. कारखान्यांच्या वर्गणीच्या दोन तृतीयांशाइतका खर्च सरकारी ग्रँटमधून होतो. ग्रेट ब्रिटनमध्यें शुद्ध संशोधनास अद्याप प्राधान्य आहे; अमेरिकेंत संशोधनाच्या व्यावहारिक उपयोगांकडे जास्त लक्ष दिलें जातें. तरीपण, ग्रेट ब्रिटनमध्येंहि आतां औद्योगिक संशोधनाचें महत्त्व जास्त जास्त पटूं लागलें आहे. ब्रिटिश प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिलची नव्यानेंच स्थापना झाली आहे, तिचेमार्फत कारखान्यांपाशीं साठत राहिलेल्या संशोधनाचें पक्क्या मालांत रूपांतर करण्यास चालना मिळेल व त्यामुळें ब्रिटिश निर्गत व्यापार सुधारेल, अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे.

भारतांतील संशोधनाची स्थिति अद्याप फारच मागासलेली आहे. पुढारलेल्या देशांच्या बरोबरीस येण्यापूर्वीं आपणांस कितीतरी पल्ला गाठावा लागेल. परदेशांतून यंत्रसामुग्री आणवून दुरून त्यांचे पाठोपाठ जाण्यांत भूषण वाटावें, ह्यापेक्षा आज अधिक कांहींच शक्य नाहीं. उद्योगधंद्यांची वाढ व त्यांचा किफायतशीरपणा ह्यांचे अभावीं संशोधनावरील खर्च ही चैनीची बाब वाटते आणि म्हणून आपल्या फारच थोड्या कारखान्यांस संशोधनशाळा जोडलेल्या आहेत. संशोधन यशस्वी झालें, तरी त्याचा फायदा करवून घेतां येईल असें आपलें आर्थिक बळ नाहीं. फार मोठ्या प्रमाणावरील उत्पादन खपण्यास आवश्यक ती क्रयशक्ति लोकांचे जवळ नाहीं. जेथें कारखानदारीस आवश्यक तो शेतीचा पायाच पुरेसा मजबूत नाहीं, तेथें औद्योगिक संशोधनास कोठून वाव रहाणार ? क्रयशक्ति सुधारण्यासाठी शेती सुधारली पाहिजे. भारत सरकार संशोधन शाळा उभारून संशोधनावर जो "मोठा" खर्च करीत आहे, तो गरजेच्या मानानें अगदींच किरकोळ आहे. शैक्षणिक संस्थांकरवी संशोधन करवून घेण्याची कारखानदारांची तयारी नाहीं, किंवा त्यास आवश्यक तें सामर्थ्य त्यांचेजवळ नाहीं. संशोधन करणारांची वृत्ति पगारी नोकराची असेल, त्यांत ध्येयवाद किंवा ईर्षा नसेल, तर प्रयोगशाळा वाढवून फारसें यश हातीं येऊं शकणार नाहीं. भारतांतील संशोधनास आवश्यक तो आर्थिक व औद्योगिक पायाच नसल्याकारणानें, जनतेंत अपेक्षा व उत्साह निर्माण करण्याचें एक साधन ह्यापेक्षां त्यास अधिक महत्त्व आज तरी नाहीं. अर्थात्, संशोधनाची विद्या टिकविली पाहिजे व वाढविली पाहिजे, हें उघड आहे. हिंदी संशोधकांना जरूर ती साधनसामुग्री उपलब्ध होण्यास ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या आधीं केल्या पाहिजेत; तरच संशोधनापासून फलनिष्पत्ति होऊं शकेल.

## भारतांतील कापसाचें उत्पादन

### लागवडीचें क्षेत्र मोठें, पण पीक लहान

जगांत कापूस पिकविणाऱ्या देशांत आज भारताचा दुसरा क्रम लागत असला आणि प्राचीन काळीं या उत्पादनाबाबत त्याची ख्याति असली तरी आपण जागतिक उत्पादनाच्या अवघे ९ टक्के कापूस पिकवितो, तर आपलें लागवडीचें क्षेत्र या पिकाखालील जागतिक क्षेत्राच्या २० टक्के आहे. भारतांतील कापसाचें एकरीं उत्पादन पावसाच्या पाण्यावर पीक काढणाऱ्या प्रदेशांत ६० ते ९० पौंड व कालव्यांखालील जमिनींत १८० ते २०० पौंड होतें, तर अमेरिकेंत हें प्रमाण २६७ पौंड व इजिप्तमध्यें ३९० पौंड पडतें. लागवडीच्या एकूण क्षेत्रापैकी ५५ टक्के क्षेत्रांत सुधारलेल्या जातींची लागवड होत असून युद्धपूर्वकाळांत हें प्रमाण अवघें १३ टक्के होतें.

सुमारें १०६ कोटी रु. भांडवल असलेल्या व प्रतिदिनीं ४,३३,००० कामगार कामावर लावणाऱ्या भारतांतील सर्वांत मोठ्या असलेल्या कापडधंद्यास योग्य प्रकारचा आणखी कापूस पुरविणें हा मूलभूत प्रश्न आहे. फाळणीमुळें उत्तम प्रतीचा १० लक्ष गांसडीच्या कापूस पिकविणारे भूभाग गमाविल्यामुळें भारत कापसाच्या बाबतींत स्वावलंबी नाहीं. अन्न पिकाखालील जमीन कापसाखालीं आल्यामुळें उत्पादनांत उल्लेखनीय वाढ झाली, परंतु असें करणें कमी केल्यामुळें गेल्या दोन वर्षांत कापूस उत्पादनांतील वाढ मंदावली आहे.

### भारतामधील चामड्याचें उत्पादन

भारतांत दरवर्षी सुमारें ५·८३ कोटी चामड्याच्या व कमावलेल्या कातड्याच्या तुकड्यांचें उत्पादन होतें. म्हशींच्या कातड्याचें उत्पादन ५० लाख तुकडे, गाईंच्या कातड्याचें उत्पादन १६० लाख तुकडे, मेंढ्यांच्या कातड्याचे तुकडे २२० लाख आणि शेळ्यांच्या कातड्यांचे तुकडे १४० लाख, असे तपशीलवार आंकडे आहेत. १९५१ साली ८० लाखांवर कातडीं क्रोमच्या साह्यानें कमावण्यांत आलीं आणि १७ लाख कातडीं वनस्पतींच्या साह्यानें कमावण्यांत आलीं. हीं सर्व कातडीं संघटित अशा कारखान्यांतून तयार करण्यांत आलीं. त्याशिवाय कातड्यांचा उपयोग करणाऱ्या कारखान्यांतून १९ लाखांपेक्षा अधिक वार चामड्यांचें कापड, ५७ लाख बुटांच्या जोड्या आणि ६१० टन लेदर बेल्टिंग तयार करण्यांत आलें. कातड्यांच्या वस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांनीं सुमारें ८·५२ कोटी रुपये किंमतीचा माल तयार केला. भारतामधील छोटेखानी कातड्याचे कारखाने दरसाल ४५० लाख कातड्यांचे तुकडे कच्चा माल म्हणून वापरतात. पायतणांचे छोटे कारखाने इंग्लिश पद्धतीच्या बुटाच्या १·२ कोटी जोड्या आणि देशी पद्धतीचीं ७ कोटी पायतणें तयार करतात असा अंदाज आहे. भारताच्या नियोजन समितीनें ह्या धंद्यासाठी १९५६ साल अखेरचीं उत्पादनाचीं उद्दिष्टें ठरवून दिलीं आहेत. परकीय हुंडणावळ मिळवून देणाऱ्या भारतामधील उद्योग धंद्यांत चामड्या–कातड्याच्या धंद्याचा चौथा अनुक्रम लागतो. १९५१–५२ सालीं चामडीं–कातडीं व त्यांच्या जिनसा मिळून ३५·३४ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करण्यांत आला. त्यांत कच्चीं व कमावलेलीं कातडीं ह्यांनीं ८·५२ कोटी रुपये मिळवून दिले. कातड्याच्या जिनसा व बूट ह्यांच्या निर्यातीमुळें १·५० कोटी रुपयांची प्राप्ति झाली.

---

### उत्तर प्रदेशांतील औद्योगिक सहकारी संस्था

उत्तर प्रदेशांतील औद्योगिक सहकारी संस्थासंबंधी प्रसिद्ध झालेल्या अहवालावरून असें दिसून येतें कीं ह्या संस्थांच्या बाबतींत त्या राज्याचा अनुक्रम भारतांत दुसरा लागतो. राज्यांत एकूण ८२५ औद्योगिक सहकारी संस्था आहेत. त्यांचे सभासद १,०५,५२१ असून खेळतें भांडवल ६४,१५,००० रुपये आहे. ह्या संस्थांपैकी ७०५ हातमाग–कामगारांच्या आहेत. विणकर संस्थांनीं ३२ उत्पादन–केंद्रें चालविलीं आहेत. गेल्या वर्षीं सर्व केंद्रांत मिळून २८,३४,००० वार कापड तयार झालें व त्यांची किंमत सुमारें १०,६४,००० रुपये झाली. सर्व केंद्रांत मिळून २,००० हातमाग होते आणि त्यांच्यावर १०० तऱ्हांचीं कापडें काढण्यांत आलीं. उरलेल्या १२० सहकारी संस्थांच्या सभासदांची संख्या ७,४१५ होती. त्यांचें भांडवल २१,६३,००० रुपये होतें. ह्या रकमेपैकी ६,५२,००० रुपये संस्थांतून काम करणाऱ्या कामगारांनींच धंद्यांत गुंतविलेलें होतें. सर्व संस्थांनीं मिळून गेल्यावर्षीं ३ लाखावर किंमतीच्या मालाची उलाढाल केली. त्यापैकीं २ लाखांची उलाढाल मालाच्या विक्रीच्या रूपानें झाली. सर्व व्यवहारांत संस्थांना अंदाजें २५,००० रुपये नफा झाला. सर्व प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्थांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्यासाठी एक मध्यवर्ती संघटना उभारण्यांत आली असून तिची नोंदणीहि करण्यांत आली आहे. ह्या संघटनेचें अध्यक्षपद राज्याचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ह्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें आहे. विविध प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्थांच्या कार्यांतील पुनरुक्ति टाळण्याच्या दृष्टीनें अशा मध्यवर्ती संघटनेचा उपयोग झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

### कपास–कापडाच्या धंद्याची प्रगति

३१ ऑगस्ट, १९५२ अखेरच्या वर्षांत भारतांतील कपास-कापडाच्या गिरण्या ४४५ च्या ४५३ झाल्या. त्यांचें वसूल भांडवल १०३·८ कोटी रुपयांचें १०६·९ कोटी रु. झालें. बसविलेल्या चात्यांची संख्या ११२ लक्षांवरून ११४ लक्षांवर गेली. चालू चात्या ९७ लाखांवरून १०१ लाखांवर गेल्या. बसविलेले व चालू माग २ लक्ष १ हजार व १,८३,०४५ चे २ लक्ष ३ हजार व १,८७,२८२ झाले. गिरण्यांनीं १८·४ लक्ष खंडीऐवजीं २०·६ लक्ष खंडी कपास वापरली. दिवसपाळीवर ४,२५,०३२ ऐवजीं ४,३२,४८८ कामगार होते.

३१ ऑगस्ट १९५२ अखेरचे १,८३,०४५ पाकिस्तानाबाबतचे आकडे खालीलप्रमाणें आहेत:— बसविलेल्या चात्या ३ लक्ष, ६२ हजार; चालू चात्या २ लक्ष, ७ हजार; चालू माग ५,०९९; कामगारसंख्या ११,४०८

---

### सांगली इंडस्ट्रियल बँक व अर्बन को. बँक, सांगली

सांगली इंडस्ट्रियल बँकेचीं कांहीं येणीं व सर्व देणीं सांगली अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेला वर्ग करण्याचें ठरलें आहे, तरी सेव्हिंग व करंट ठेवीदारांनीं आपलीं खातीं अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेला वर्ग करण्याची कृपा करावी; कायम ठेवींच्या रकमा मुदत संपतांच व्याजासह अर्बन बँकेंतून मिळण्याचीहि व्यवस्था केली आहे, असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

---

### हिंदी राष्ट्रगीताचें स्पॅनिश भाषांतर

तिसऱ्या हिंदी रिपब्लिक दिनाचे निमित्तानें अर्जेंटाइनमधील सुप्रसिद्ध लेखक ओकॅम्पो ह्यांनीं हिंदी राष्ट्रगीताचें स्पॅनिशमध्यें भाषांतर केलें आहे. डॉ. टागोरांनीं १९२४ मध्यें स्पेनला भेट दिली, त्यावेळीं ओकॅम्पो ह्यांचे ते पाहुणे होते.

---

### सिंद्री कारखान्यामुळें परराष्ट्रीय हुंडणावळीची बचत

सिंद्री येथील कारखान्याच्या खतांच्या उत्पादनामुळें १० जानेवारी अखेर भारताची ६ कोटी रुपयांची परराष्ट्रीय हुंडणावळीची बचत झाली आहे.


अखिल भारतीय बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष, शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांच्या हस्तें बँकिंग प्रदर्शनाच्या उद्‌घाटनसमयीं प्रकाशिलेलें

**बँका**

**( काल, आज व उद्या )**

संपादक : श्री. वा. काळे, संपादक " अर्थ "

बँकिंगची इतिहासकालीन, कालची व आजची माहिती सोप्या भाषेंत व तपशिलवार देऊन उद्याच्या बँकिंगच्या दिशेचें व्यावहारिक विवेचन प्रस्तुत पुस्तकांत करण्यांत आलें आहे.

पुस्तकांत सहकारी आणि जॉइंट स्टॉक, दोन्ही प्रकारच्या बँकिंगचा परामर्श घेतलेला असल्यानें, महाराष्ट्रांतील बँकांशीं संबंध येणाऱ्या सर्वांनाच प्रस्तुत पुस्तक उद्बोधक वाटेल.

किंमत १ रु. ८ आ.

(१) पुणें बँकिंग असोसिएशन, २६१, बुधवार, पुणें २.
(२) " अर्थ ", दुर्गाधिवास, पुणें ४.

## मध्यभारतांतील सहकारी चळवळीचें नियोजन

(वैकुंठ ल. मेहता)

प्लॅनिंग कमिशनच्या अहवालांत, भारताच्या आर्थिक प्रगतींत सहकारी चळवळीस महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. पंचवार्षिक योजनेचा खर्डा प्रसिद्ध झाल्यानंतर सहकारी प्रगतीची आखणी करणारें मध्यभारत हें पहिलेंच राज्य आहे. पूर्वीचे प्रांत किंवा म्हैसूर सारखीं संस्थानें ह्यांचेपेक्षा, पूर्वीच्या संस्थानांतून एकत्रीकरणाच्या मार्गानें निर्माण झालेल्या नव्या राज्यांत सहकारी चळवळीची वाढ करणें अगदीं वेगळ्या प्रकारचें काम आहे. मध्यभारत ह्या नव्या राज्यांत २५ हिंदी संस्थानें सामील झालेलीं आहेत, त्यांपैकी ग्वालेर आणि इंदूर ह्या दोहोंतच फक्त सहकारी चळवळ प्रगत करण्याचे प्रयत्न पूर्वी करण्यांत आले होते. राजगढ, नरसिंगगढ, खिलचिपूर, रतलाम आणि देवास ह्यांसारख्या लहान संस्थानांतूनहि थोडा प्रारंभ झालेला होता. ग्वालेरसाठी प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं सुमारें १५ वर्षांपूर्वी सहकारी प्रगतीची योजना आंखून दिली होती आणि इंदूरमध्यें, मद्रासच्या सहकारी खात्याचे श्री. आर. के. नायडू ह्यांनीं मर्यादित क्षेत्रापुरता आराखडा तयार केला होता. ह्या दोन्ही संस्थानांनीं ह्या योजनांची अंमलबजावणी कशी केली, तें पहाण्याचें आतां कारण उरलेलें नाहीं; कारण ह्यापुढील वाढ आतां दोन्ही संस्थानांतच नव्हे, तर सामील झालेल्या इतर संस्थानांतहि एकाच पद्धतीनें झाली पाहिजे. ह्या दृष्टीनें, मध्य भारत सरकारनें डिसेंबर १९५१ मध्यें प्रो. द. गो. कर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली, तिनें सहा महिन्यांचे अवधींत आपला अहवाल सादर केला. लोकशाही योजनांत सहकारी चळवळीस महत्त्वाचें स्थान जरूर आहे, हें पटवून देऊन कमिटीनें मध्यभारतांतील भौगोलिक परिस्थिति, नैसर्गिक संपत्ति, लोकसंख्येचा तपशील, तेथील सहकारी चळवळीचा पूर्वीचा अनुभव, हीं सर्व विचारांत घेऊन आपल्या सूचना केल्या आहेत. शेतीच्या अर्थव्यवस्थेस आणि विक्रीच्या योजनेस कमिटीनें महत्त्वाचें स्थान दिलें आहे, तें मध्यभारताच्या आर्थिक परिस्थितीस धरूनच आहे. प्राथमिक सोसायट्यांची पुनर्घटना व वाढ केली पाहिजे, सेंट्रल फिनॅन्सिंग एजन्सीज मजबूत केल्या पाहिजेत, जिल्हा बँकांची वाढ केली पाहिजे, सबंध राज्याकरितां केंद्रीय बँक स्थापन केली पाहिजे, इत्यादि सूचना कमिटीनें केल्या आहेत. ग्वाल्हेर आणि इंदूर ह्यांच्या सेंट्रल बँकांनीं एकत्र येऊन केंद्रीय बँक सामर्थ्यवान केली आणि सरकारनें तिला कार्यक्षम अधिकारीवर्ग देऊन व आर्थिक मदत करून सहाय्य केलें तरी त्या संस्थेच्या सहकारी बँकिंगचा दर्जा मद्रास व मुंबई येथील राज्य बँकांच्या तोडीचा झाल्याविना रिझर्व्ह बँकेशीं तिला निगडित नातें जोडतां यावयाचें नाहीं.

प्रगतीच्या विस्ताराप्रमाणें त्याच्या दर्जाकडेहि कमिटीनें लक्ष पुरविलें आहे. सहकारी चळवळीची प्रगति योग्य प्रकारें होत आहेना, याकडे लक्ष देण्यासाठी व ट्रेनिंग आणि प्रचार ह्यांसाठी सहकारी इन्स्टिट्यूटची आवश्यकता आहे. सरकारच्या आर्थिक नियोजनांतील सहकाराचें स्थान लक्षांत घेऊन, सरकारनें कमिटीच्या शिफारसींनुसार सहकारी चळवळीची वाढ घडवून आणणें हें त्याचें कर्तव्य व त्याची जबाबदारीच ठरते. त्याबरोबरच जागृत लोकमत, लोकांचा पाठिंबा, उत्साह, ह्यांचीहि प्रगतीस आवश्यकता आहे, हें विसरून चालणार नाहीं.

(दि बाँबे को. क्वार्टर्ली, जानेवारी १९५३).

SAVE to help yourself and the NATION



WITH THE HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

### इन्कमटॅक्स वसुलींत वाढ

१९५२–५३ मध्यें इन्कम टॅक्सची वसुली १५५ कोटी रुपये होईल असें गृहीत धरलें होतें, परंतु दुरुस्त अंदाजांतील रक्कम त्यापेक्षा बरीच मोठी आहे. १९५२–५३ मधील पहिल्या नऊ महिन्यांतील वसुलीची रक्कम १०९ कोटी रु. भरली. १९५१–५२ च्या तत्सम आकड्यापेक्षा हा आंकडा ४·२ कोटी रुपयांनीं मोठा आहे आणि १९५०–५१ च्या आकड्यांपेक्षा तर ८ कोटी रुपयांनीं मोठा आहे. वर्षाच्या शेवटच्या तिमाहींतील वसुली इतर कोणत्याहि तिमाहीपेक्षा जास्त भरते, म्हणून १९५२–५३ च्या अंदाजापेक्षा वसुली बरीच जास्त होईल, हें उघड आहे.

### १७०–CO–२ कपास

लांब धाग्याचा एक नवीन कापूस सुरत येथील सरकारी फार्मवर तयार करण्यांत आला आहे. त्यापासून ५० नंबराचें सूत निघूं शकतें. राजस्लायम कापसापेक्षा त्यापासून १३% जास्त उत्पादन निघतें. त्याला १७०–CO–२ असें नांव देण्यांत आलें आहे. हिंदी–अमेरिकन कपाशीच्या संकराच्या ह्या कापसाची मोठ्या प्रमाणावर लागवड होऊं शकेल. येत्या मोसमांत सुमारें २५,००० एकरांत तो लावला जाईल.

### विश्वेश्वर अय्या स्मारकें

म्हैसूरच्या सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं केलेल्या बहुमोल सेवेची आठवण म्हणून म्हैसूर सरकार त्या राज्यांत ठिकठिकाणीं त्यांचीं स्मारकें उभारणार आहे. भद्रावती येथें सर विश्वेश्वर अय्यांनीं लोखंड–पोलादाचा कारखाना स्थापन केला म्हणून तेथें त्यांचा पुतळा उभारण्यांत येणार आहे.

### एक शून्य जास्त पडल्यानें घोटाळा

इडॅहोचा गव्हर्नर लेन जॉर्डन ह्यानें सरकारी कोर्ट रिपोर्टरचा पगार वाढविणाऱ्या बिलावर सही केली, त्यामुळें रिपोर्टर हा तेथील सर्वांत मोठा पगारदार (सालिना ४८,००० डॉलर्स) बनला. वास्तविक त्याचा पगार ४,००० डॉलर्सचा ४,८०० डॉलर्स व्हावयाचा, पण टाइपिस्टनें चुकून एक शून्य वाढवून तो ४८,००० डॉलर्स केला. हा आकडा दुरुस्त करणारें बिल आतां विधिमंडळांत मांडण्यांत येईल. इडॅहो हें युनायटेड स्टेटसमधील एक घटकराज्य आहे.

## मुंबई राज्यांतील पशुधन व शेतीचीं अवजारें

मुंबई सरकारच्या ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक्स अँण्ड स्टॅटिस्टिक्सनें राज्यांतील पशुधनाची व शेतीच्या अवजारांची नुकतीच खानेसुमारी केली. पशुधनांत दुभतीं व शेतीचीं जनावरें, मेंढ्या, शेळ्या, घोडे, गाढवें, खेचरें, उंट, डुकरें व कोंबड्या यांचा समावेश होतो. ही खानेसुमारी "यूनो"च्या अन्न व शेतकी संघटनेनें सुचविलेल्या पद्धतीनें करण्यांत आली. यावेळीं ग्रामीण भागांतील व जंगल टापूंतील गुरांची आणि त्याचप्रमाणें उनाड गुरांचीहि खानेसुमारी करण्यांत आली.

### गायी आणि बैल

मुंबई राज्यांत बृहन्मुंबई व २७ जिल्हे यांत मिळून तीन वर्षांवरच्या कामाच्या बैलांची संख्या ५२,०९,८८० आहे. पैदाशीच्या वळूंची संख्या ८९,१०६ व इतर वळूंची संख्या ९४,४७५ आहे.

दुभत्या जनावरांची (तीन वर्षांवरील) संख्या पुढीलप्रमाणें आहे:— दूध देणारीं गुरें १७,३६,६८० असून भाकड गुरें १२,४९,४०७ आहेत. न व्यालेलीं ४,३८,४९९, कामाचीं ७३,४५६ व इतर ३४,६९७ आहेत. वासरांची संख्या २९,८९,१०१ असून त्यांपैकीं एक वर्षाखालील नर ५,४१,८६१, एक वर्षाखालील माद्या ५,६८,१४८ आणि एक ते तीन वर्षांपर्यंतचे नर १०,२०,४६९ आणि एक ते तीन वर्षांपर्यंतच्या माद्या ८,५८,६२३ आहेत.

तीन वर्षांवरील रेड्यांची एकूण संख्या ३,०६,८७९ असून त्यांत कामाच्या २,७३,७६९ रेड्यांचा समावेश होतो. तीन वर्षांवरील म्हशींची संख्या एकूण २४,४१,९९८ असून त्यांपैकीं १५,३६,३४२ दूध देणाऱ्या असून ६,४३,५०२ भाकड आहेत. २,१६,१६६ अद्याप न व्यालेल्या अशा असून ३१,८५२ कामाच्या व १४,१८६ इतर आहेत. एक वर्षाखालील नर १,८०,७७३ असून माद्या ४,१३,४०४ आहेत. एक ते तीन वर्षांपर्यंतचे नर २,०७,२०७ असून माद्या ६,११,६८९ आहेत.

### इतर गुरें

मेंढे व मेंढ्यांची एकूण संख्या २५,१५,४२३ असून शेळ्यांची ४३,११,६३० आहे. राज्यांत एकूण १,३४,४२४ घोडे असून १,१५,७१३ गाढवें, ३,०२२ खेचरें, २५,८१२ उंट व ७३,६६४ डुकरें आहेत.

कोंबड्यांची एकूण संख्या २२,२४,५७४ असून त्यांपैकीं ९,३४,८५१ कोंबडे व १९,८७,६६७ पिलें आहेत. बदकें ४०,८२२ आहेत.

### शेतीचीं अवजारें

राज्यांतील शेतीचीं यंत्रें व अवजारें: याबाबतचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत:—

| | | |
|---|---|---|
| नांगर | | |
| (१) लांकडी | ... | २३,६४,५५८ |
| (२) लोखंडी | ... | २,१७,७२८ |
| बैलगाड्या | ... | १०,७७,३७२ |
| उसाचे चरक | | |
| (१) इंजनावर चालणारे | ... | ७,३३१ |
| (२) बैलांच्या सहाय्यानें चालणारे | ... | ११,६८७ |
| ऑईल इंजिनें | ... | २८,१४० |
| इलेक्ट्रिक पंप | ... | १,२३७ |
| ट्रॅक्टर | ... | १,०६६ |

| | |
|---|---|
| घाण्या | |
| पांच शेरांच्या व त्यापेक्षा अधिक मापाच्या | ८,३११ |
| पांच शेरांपेक्षा कमी | ३,४७५ |

### जिल्ह्यांतील स्थिति

खालील बाबतींत संख्येच्या दृष्टीनें पहिले तर पहिले तीन जिल्हे पुढीलप्रमाणें आहेत:—

**पशुधन**

दुभतीं गुरें—पंचमहाल, अहमदनगर, रत्नागिरी.
मेंढ्या—उत्तर सातारा, बेळगांव, पुणें.
शेळ्या—अहमदनगर, नाशिक, पुणें.
घोडे—पश्चिम खानदेश, अहमदनगर, नाशिक.
गाढवें—मेहसाणा, बनासकांठा, अहमदाबाद.
कोंबड्या—रत्नागिरी, पुणें, सुरत.

**शेतीचीं अवजारें**

लांकडी नांगर—रत्नागिरी, पंचमहाल, धारवाड.
ट्रॅक्टर—खेडा, धारवाड, अहमदनगर.

### भारतामधील सुशिक्षितांची बेकारी

१९५२ च्या मे ते ऑक्टोबर ह्या कालांत भारतामधील सुशिक्षित बेकारांची संख्या १०,६३२ नीं वाढली असें आढळून आलें. उत्तर प्रदेशांतील बेकारांची संख्या ५,२५१ नें वाढली; मद्रासमधील बेकारांत ५,२०५ जणांची भर पडली आणि प. बंगालमधील संख्या १,५१४ नें फुगली. दिल्ली राज्यांत मात्र वरील कालांत बेकारांची संख्या १,७७४ इतक्यांनें कमी झाली. पदवीधरांच्या बेकारींत उत्तर-प्रदेशाचा अनुक्रम पहिला लागतो तर मॅट्रिक झालेल्या बेकारांची संख्या मद्रास राज्यांत सर्वांत अधिक आहे. कलकत्त्यामध्यें वरील कालांत ११,७२९ मॅट्रिक झालेल्यांनीं व २,४०२ पदवीधरांनीं उद्योग विनिमय केंद्रांत आपलीं नांवें नोंदविलीं. मुंबई राज्यांत ६,६४६ मॅट्रिक झालेल्यांनीं व १,१७७ पदवीधरांनीं आपलीं नांवें नोंदविलीं. दिल्ली राज्यांत ५,५३० मॅट्रिक झालेल्यांनीं व १,६८० पदवीधरांनीं नांवें नोंदविलीं. मद्रास राज्यांतील हे आंकडे अनुक्रमें ३,२५६ व ६३६ असे आहेत. मुंबई, मद्रास, कलकत्ता व दिल्ली ह्या चार शहरांतील उद्योगविनिमय केंद्रांतून एकूण सुशिक्षित बेकारांच्या संख्येपैकीं २५ टक्के लोकांनीं आपलीं नांवें नोंदविलीं. उद्योग-विनिमय केंद्रांच्या तर्फे नोकरी मिळवूं इच्छिणाऱ्या एकूण पदवीधरांपैकीं ३७ टक्के पदवीधरांनीं आपलीं नांवें वरील चार उद्योगविनिमय केंद्रांत नोंदविलीं होतीं असें आढळून आलें. विनिमय केंद्रांत झालेल्या नोंदणीवरून असेंहि दिसून आलें कीं पदवीधरांच्या पेक्षा मॅट्रिक झालेल्या बेकारांची संख्या अधिक झपाट्यानें वाढली. मॅट्रिक बेकारांत ४,८७८ मुली होत्या असें दिसून आलें. १० ऑक्टोबर, १९५२ ह्या दिवशी एकूण ५,६०८ सुशिक्षित स्त्रिया नोकरीच्या शोधांत होत्या. भारताच्या पंचवार्षिक आर्थिक कार्यक्रम मुख्यतः ग्रामीण विभागापुरता असल्यानें सुशिक्षित बेकारांचें भवितव्य कठीणच दिसतें.

**अब्राहम लिंकनची खुर्ची**—अमेरिकेचा पहिला अध्यक्ष ॲब्रहम लिंकन ह्याच्या मालकीच्या तीन खुर्च्या आणि एक सोफा सध्या लंडनमधील एका सॉलिसिटरजवळ आहेत. त्यानें ह्या वस्तु एका अमेरिकन प्रोफेसराकडून कांहीं वर्षांपूर्वी विकत घेतल्या होत्या. प्रे. आयसेनहोवर ह्यांच्यासाठी त्या मिळविण्याचे प्रयत्न अमेरिकन सरकार करीत आहे असें समजतें.

## राज्यांचीं उत्पन्नाचीं साधनें वाढणार

### अर्थमंडळाच्या शिफारसी

घटनेच्या २८० व्या कलमानुसार राष्ट्रपतींनीं अर्थमंडळाची स्थापना केली होती. या मंडळानें ३० नोव्हेंबर, १९५१ रोजीं आपल्या कामास सुरवात करून ३१ डिसेंबर, १९५२ रोजीं आपला अहवाल राष्ट्रपतींस सादर केला.

श्री. के. सी. नियोगी, श्री. वैकुंठराय मेहता, न्यायमूर्ति श्री. आर. कौशलेन्द्रराव, श्री. बी. के. मदन आणि श्री. एव्. व्ही. रंगाचारी हे या मंडळाचे सदस्य होते.

मध्यवर्ती सरकारकडून राज्यांना मिळणाऱ्या महसुलाच्या वाट्यांत पुरेशी वाढ करण्याची शिफारस अर्थमंडळानें केली आहे, त्याचप्रमाणें मध्यवर्ती सरकारकडून राज्यसरकारांना मिळणाऱ्या मदतींचें नियमन करणारीं सर्वसामान्य तत्त्वेंहि अर्थमंडळानें घालून दिलीं आहेत. मंडळाच्या शिफारशींचा सरकारनें स्वीकार केला आहे.

शिफारशी करतांना मंडळानें आपल्यापुढें तीन मुख्य गोष्टी ठेवल्या होत्या. पहिली अशी कीं, देशाचें संरक्षण आणि अर्थव्यवस्थेचें स्थैर्य यांसारख्या आपल्या जबाबदाऱ्या विचारांत घेऊन आपल्या साधनांवर प्रमाणाबाहेर ताण पडूं न देतां मध्यसरकारनें राज्यांची मदत वाढवावी. दुसरी अशी कीं, मदत देण्यामागील तत्त्वें अ व ब विभागीय राज्यांस सारखींच लागू करण्यांत यावींत आणि तिसरी म्हणजे ही मदत देतांना निरनिराळ्या राज्यांतील विषमता कमी करण्याचा प्रयत्न व्हावा.

#### प्राप्तीकराच्या उत्पन्नाची वाटणी

सध्या प्राप्तीकराच्या उत्पन्नांतील ५० टक्के उत्पन्न राज्यसरकारांस दिलें जातें, तें ५५ टक्केपर्यंत वाढवावें अशी मंडळानें शिफारस केली आहे. 'क' विभागीय राज्यांस मिळणाऱ्या अशा उत्पन्नाचें प्रमाण २.७५ टक्के ठरविण्यांत आलें आहे.

निरनिराळ्या राज्यांचा प्राप्तीकरांतील वांटा पुढीलप्रमाणें असावा असें मंडळानें सुचविलें आहे:—

| राज्यें | मंडळानें शिफारस केलेलें शेंकडा प्रमाण |
|---|---|
| १. आसाम | २.२५ |
| २. बिहार | ९.७५ |
| ३. मुंबई | १७.५० |
| ४. हैद्राबाद | ४.५० |
| ५. मध्यभारत | १.७५ |
| ६. मध्यप्रदेश | ५.२५ |
| ७. मद्रास | १५.२५ |
| ८. म्हैसूर | २.२५ |
| ९. ओरिसा | ३.५० |
| १०. पेप्सु | ०.७५ |
| ११. पंजाब | ३.२५ |
| १२. राजस्थान | ३.५० |
| १३. सौराष्ट्र | १.०० |
| १४. त्रावणकोर—कोचीन | २.५० |
| १५. उत्तरप्रदेश | १५.७५ |
| १६. पं. बंगाल | ११.२५ |


१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी

वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

**वेस्टर्न इंडिया लाईफ**

**इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.**

शाखा कचेरी:— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर—ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें—१

फोन नंबर— ३४०२

**दि सांगली बँक लिमिटेड**

**सांगली**

( स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक )

**मुख्य ऑफिस : सांगली**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंड्स | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंड्स | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदेळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

### ३१-१२-५२ रोजींचा संक्षिप्त ताळेबंद

| देणें | रु. | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १६,००,००० | कॅश, रिझर्व्ह व | |
| रिझर्व्ह व इतर फंड | ५,६५,००० | इं. बँकेंत | ३३,६४,४९७ |
| ठेवी | २,८१,९२,६११ | इन्व्हेस्टमेंटस | १,२१,३९,८७३ |
| १९५२ चा नफा | २,५४,५२० | अडव्हान्सेस | १,४१,०६,४४० |
| | | इमारत, से.डि. हॉल्ट | ५,९०.८३३ |
| | ३,२५,१०,४६४ | | ३,२५,१०,४६४ |

### ३१-१२-५२ चें संक्षिप्त नफा तोटा पत्रक


| खर्च | रु. | जमा | रु. |
|---|---|---|---|
| दिलेलें व्याज | ४,२२,८५० | व्याज व डिस्कौंट | ११,१२,१०३ |
| पगार, भत्ते | ३,७६,१७३ | कमिशन, हुंडणावळ | १,०६,७६३ |
| नफा | २,५४,५२० | इतर | ६,५४६ |
| | १२,२५,४१३ | | १२,२५,४१३ |

### त्रावणकोर–कोचीनमधील सहकारी चळवळ

त्रावणकोर–कोचीन राज्यांतील सहकारी चळवळीचा १९५१–५२ सालचा अहवाल सहकारी खात्यानें प्रसिद्ध केला आहे. अहवालांत पुढीलप्रमाणें माहिती आढळते. राज्यांत १५ सहकारी शेतीच्या संस्था होत्या. त्या सर्वांनी मिळून ९४८ एकर जमीन लागवडीखालीं आणली आणि ८६,००० परा भात निर्माण केलें. 'लिफ्ट इरिगेशन' करणाऱ्या ८ सहकारी संस्था होत्या. त्यांनी १,७१० एकर जमिनीची मशागत केली व २,०६,००० परा भात निर्माण केलें. १९७ सहकारी संस्थांनी खताची विक्री करण्याचें काम केलें. शेतकऱ्याला विकण्यासाठी म्हणून त्यांनी ६,४१,९३५ रुपये किंमतीचें खत विकत घेतलें. त्याची विक्री करून ह्या संस्थांनी ४३,०९३ रुपये मिळविले. ज्या अन्नधान्यावर नियंत्रण आहे अशा धान्यांची किरकोळ विक्री करण्याच्या कामांत ७८१ सहकारी संस्था गुंतल्या होत्या. त्यांनी ४,१८,८४,४५९ रुपये किंमतीचे भावनियंत्रित जिन्नस घेतले. ह्या पदार्थांची विक्री करून त्यांना ४,२१,९२,२२१ रुपये मिळाले व १२,२८,५७९ रुपये नफा झाला. ३४ सहकारी संस्था वाचनालयें चालवीत होत्या. सैन्यांतून निवृत्त झालेल्या सैनिकांनीं चालविलेल्या ५७ सहकारी संस्था होत्या. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचा एकूण रिझर्व्ह फंड २५,७१,६४३ रु. होता. रिझर्व्ह फंडाच्या रकमेपैकीं ९,८७,३६० रुपये वर्षअखेर कोठल्याही प्रकारानें गुंतविण्यांत आलेले नव्हते असें आढळून आलें. वरील अहवालावरून राज्यांतील सहकारी संस्थांची विविधता सहज लक्षांत येण्यासारखी आहे.

### बँक ऑफ म्हैसूरची नोकरवर्गासाठी वसाहत

बँक ऑफ म्हैसूरच्या नोकरवर्गासाठी बँकेनें ९ लक्ष रुपये खर्च करून १०० बिऱ्हाडांची एक वसाहत जयनगर विभागांत बंगलोर येथें तयार केली आहे. तिचें उद्घाटन नुकतेंच झालें.



परंतु
ह्याकरितां
आपल्या ठेवी
योग्य बँकेत
राहूंद्या.

भांडवल

★ वसूल भांडवल रु.१६,००,०००
★ रिझर्व्ह फंड रु. ५,६५,०००
★ खेळते भांडवल रु.३ कोटींवर

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

–पुणें २.– मॅनेजर– चिं. वि. जोग.

पुणें डेक्कन जिमखाना शाखेंतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टसचा अवश्य फायदा घ्यावा.

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें १.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.
★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.
★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.
★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.
★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.
★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.